A GUIDE

TO THE

FIRST BOOK OF SANSKRIT

(*Sir Dr. Bhandarkar*)

BY

Balkrishna Anant Bhide, B. A.,

Head Master, Sir S. A. High School,

MURUD, JANJIRA,

AND

N. V. Kuvalekar,

Teacher, Aryan Education Society's High School,

BOMBAY

PUBLISHED BY

KESHAV BHIKAJI DHAWALE, Girgaon, Bombay

1934.

Price 8 Annas

Printed by S V. Parulekar, at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Building, Sandhurst Road, Bombay

and

Published by Keshav Bhikaji Dhawale, Ramchandra Building, Girgaon, Bombay

THE ALPHABET. (वर्णमाला, मूळाक्षरें).

The Sanskrit Alphabet consists of 46 letters. Of these 13 are vowels and 33 consonants. The letters are signs of sounds, and sounds are produced by regulating the pressing of breath from the mouth with the help of certain organs of the mouth, and sounds are classified according to these organs. Some sounds are produced by allowing the breath to go out unhindered from the throat; they are called Gutturals (throat-sounds). Some other sounds are produced by regulating the breath with the tongue which presses against the palate (the roof of the mouth), or doubles itself, or presses against the teeth with its tip; these sounds are, therefore, called Palatals, Linguals and Dentals, respectively. Some others are produced chiefly by moving the lips and are called Labials. (संस्कृत वर्णमालेंत ४६ वर्ण आहेत; पैकीं १३ स्वर व ३३ व्यंजनें आहेत. वर्ण हे ध्वनीच्या खुणा आहेत, आणि तोंडाच्या निरनिराळ्या अवयवांच्या साह्यानें श्वासाच्या गतीला शिस्त लावून निरनिराळे ध्वनि उच्चारले जातात, आणि या मुखावयवांच्या अनुरोधानें वर्णांचे वर्ग करण्यांत येतात. जे वर्ण कंठांतून श्वास सरळ बाहेर लोटण्यानें उच्चारले जातात, त्यांना कंठ्य म्हणतात. कित्येक वर्णांचे उच्चार करतांना जिभेची हालचाल होऊन, ती श्वासगतीला शिस्त लाविते जीभ कांहीं उच्चार करतांना तालूला (हिरड्यांच्या वरच्या भागाला) दाबते, कधीं ती दुमडून वर मूर्धाला (तोंडाच्या अटळ्याला) स्पर्श करते, किंवा आपल्या बोथीनें दांतांवर चेपते. अशा वर्णोच्चारांना अनुक्रमें तालव्य, मूर्धन्य, व दन्त्य अशीं नांवें आहेत. कांहीं उच्चार ओंठांच्या चलनवलनानें होतात, त्यांना ओष्ठ्य म्हणतात.)

In addition to the above, the breath may be hissed between the tongue and the teeth or palate, or it may be driven with full intensity between them or forced

through the nose, and then the sound is said to be sibilant, aspirate, or nasal accordingly. (वरील प्रकारांनीं होणाऱ्या उच्चारांतही कधीं श्वास जीभ आणि दांत, तालु किंवा मूर्धा, यांच्या फटींतून सुस्कारत जातो, किंवा जोरानें घोषतो, किंवा नाकांतून चेपला जातो. या क्रियानुसार उच्चारांचे उष्म, महाप्राण आणि नासिक्य किंवा अनुनासिक असे भेद होतात.)

Some consonantal sounds are modifications of vowel sounds, and they are called semi-vowels. (कांहीं व्यंजनोच्चार स्वरोच्चारांच्या किंचित् फरकानें झालेले असतात; त्यांना अर्धस्वर किंवा अन्तःस्थ म्हणतात.)

The following table shows all these divisions and sub-divisions of the alphabet. (खालील कोष्टकांत वर्णमालेचे हे सर्व वर्ग व पोट-वर्ग दाखविले आहेत.)

Alphabet: वर्णमाला.

Class (वर्ग)	Vowels (स्वर)	Consonants (व्यंजनें).				
		....	Nasals नासिक्य	Semi-vowels अर्धस्वर	Sibilants उष्म	Aspirate महाप्राण
Gutturals कंठ्य	अ, आ.	क्,ख्,ग्,घ्	ङ्	–	–	ह्.
Palatals तालव्य	इ, ई, ए, ऐ.	च्,छ्,ज्,झ्.	ञ्.	य्.	श्.	–
Linguals मूर्धन्य	ऋ, ॠ.	ट्,ठ्,ड्,ढ्	ण्.	र्.	ष्.	–
Dentals दन्त्य	ऌ.	त्,थ्,द्,ध्.	न.	ल्.	स्.	–
Labials ओष्ठ्य	उ, ऊ, ओ, औ.	प्,फ्,ब्,भ्.	म.	व्.	–	–

Note:—ए, ऐ are really Gutturo-Palatals and ओ, औ Gutturo-Labials. व् is a Dento-Labial, for in pronouncing

it the lower lip bends in, while the upper teeth press upon it. (ए, ऐ हे वर्ण खरोखर कंठतालव्य व ओ, औ हे कंठौष्ठ आहेत. व् हा दन्तौष्ठ आहे, कारण त्याच्या उच्चारांत खालचा ओंठ आंत वळून, त्यावर वरील दांत दाब घालतात.)

The vowels are also classified as short and long and long vowels are further divided into simple and dipthongs. (स्वरांचे ऱ्हस्व व दीर्घ असेही वर्ग पडतात आणि दीर्घ स्वरांचे पुन्हां शुद्ध व संयुक्त असे दोन पोटवर्ग होतात.)

Vowels: स्वर

Short. ऱ्हस्व.	Long. दीर्घ.	
	Simple. शुद्ध.	Dipthongs. संयुक्त
अ	आ	
इ	ई	ए, ऐ
उ	ऊ	ओ, औ.
ऋ	ॠ	
ऌ	–	

The consonants are also divided into soft and hard. Besides, there are pairs of consonantal sounds in which though the sounds are alike, one has a distinct aspirate element which the other lacks. The former is called aspirate and the latter unaspirate. (व्यंजनांचे मृदु व कठोर असेही वर्ग पाडतात. यांनाच संस्कृत व्याकरणांत नाद (किंवा घोषवर्ण) आणि श्वास (किंवा सघोषवर्ण) म्हणतात. शिवाय अशा कांहीं (क्-ख् सारख्या) व्यंजनांच्या जोड्या आहेत, कीं प्रत्येक जोडींतील वर्णांचे उच्चार जरी मुख्यतः सारखे असले तरी एकांत ह्काराचा भास दुसऱ्यापेक्षां स्पष्ट होतो, व म्हणून त्यांचे महाप्राण अल्पप्राण असे भेद करतात.)

व्यंजनें.

Hard कठोर (श्वास)			Soft मृदु (नाद)		
Unaspirate अल्पप्राण	Aspirate महाप्राण	Others इतर	Unaspirate अल्पप्राण	Aspirate महाप्राण	Others इतर
क्	ख्	–	ग्	घ्	ङ्
च्	छ्	–	ज्	झ्	ञ्
ट्	ठ्	–	ड्	ढ्	ण्
त्	थ्	–	द्	ध्	न्
प्	फ्	–	ब्	भ्	म्
		श्, ष्, स्		ह्	य्, र्, ल्, व्

अनुस्वार and विसर्ग are two additional sounds included in Sanskrit alphabet. Consonants are pronounced only when they are followed by a vowel, hence they are called स्वरान्त वर्ण. But अनुस्वार (ं) and विसर्ग (:) can be pronounced only when they are preceded by a vowel; hence they are called स्वरादि वर्ण. (संस्कृत वर्णमालेंत अनुस्वार व विसर्ग हेही आणखीं दोन वर्ण गणण्यांत येतात. व्यंजनांच्या पुढें स्वर आला, म्हणजेच त्यांचा उच्चार होतो, म्हणून व्यंजनांना ‘ स्वरान्त वर्ण ’ म्हणतात. पण अनुस्वार (ं) व विसर्ग (:) यांचा उच्चार मागें स्वर असल्यासच होतो, म्हणून त्यांना ‘ स्वरादि वर्ण ’ म्हणतात.)

सन्धिविचार.

In Sanskrit when two vowels or consonants come together or when विसर्ग is followed by a vowel or consonant, they generally combine, and this combination is called सन्धि. When the letters that thus combine, are both vowels, the सन्धि is called स्वरसन्धि; but if one or both of them are consonants, it is called व्यञ्जन-सन्धि, and if one of them is विसर्ग, it is called विसर्ग-सन्धि. Again such *sandhi*

may take place between the letters of verbal or nominal bases and terminations, or letters of separate words. In the first case the *Sandhi* is called अन्तःसन्धि, while in the second it is called बहिःसन्धि. (संस्कृतांत दोन स्वर अगर व्यंजनें, किंवा विसर्ग आणि स्वर किंवा व्यंजन, हीं एकत्र आलीं असतां, त्यांचा बहुशः संयोग होऊन एक जीव होतो, या मिलाफाला 'सन्धि' म्हणतात. जेव्हां हा संयोग दोन स्वरांमध्यें होतो, तेव्हां त्याला 'स्वरसन्धि' हें नांव देतात; दोन्ही वर्णांपैकीं एक किंवा दोन्ही व्यंजनें असल्यास 'व्यंजनसन्धि' होतो; आणि विसर्ग व स्वर किंवा व्यंजन यांचा संधि झाल्यास त्यास 'विसर्गसन्धि' हें नांव आहे. शिवाय असा संधि नामांच्या किंवा धातूंच्या अंगांना प्रत्यय लावतांना होतो, अथवा वाक्यांतील एका शब्दाच्या अंतींचा वर्ण व दुसऱ्या शब्दाच्या आरंभींचा वर्ण यांमध्यें होतो; म्हणून त्यांना अनुक्रमें 'अन्तःसन्धि' व 'बहिःसन्धि' अशीं नांवें देतात.)

Most of the *Sandhi* rules given in the Appendix to the First Book are applicable both to internal and external *Sandhis*. But a few of them are exclusively applicable to internal *Sandhi*, and they are as follows: Nos. 23, 26, 31, 34, 35. (पहिल्या पुस्तकाच्या पुरवणींत दिलेले बहुतेक सन्धिनियम अन्तःसन्धि व बहिःसन्धि अशा दोहोंसही लागू आहेत. परंतु कांहीं थोडे केवळ अन्तःसन्धीसंबंधींच आहेत. ते पुढील प्रमाणें:—अंक २३,२६,३१,३४,३५).

संधिविचार.

The *Sandhi* Rules are given here together at the beginning. But students are to learn them only as they come in the course of their study. In the following lessons the *Sandhi* rules that are applicable in particular cases, will be shown by Rule Numbers and students will then learn them. (येथें आरंभींच सर्व संधिनियम एकत्र दिले आहेत. परंतु अभ्यासक्रमांत ते जसजसे येतील तसतसे शिकावयाचे आहेत. पुढील धड्यांत जेथें जे नियम लागू असतील, तेथें त्या नियमांचे आंकडे दिले जातील, व त्याच वेळीं विद्यार्थ्यांनीं ते शिकावयाचे आहेत.)

Sandhi Rules.

Guṇa and Vṛiddhi.

1. The *guṇa* of इ or ई is ए, of उ or ऊ is ओ, of ऋ or ॠ is अर्, and of ऌ is अल्.

2. The *vṛiddhi* of अ is आ, of इ, ई or ए is ऐ, of उ, ऊ or ओ is औ, ऋ or ॠ is आर्, and of ऌ is आल्.

Vowels.

3. In Sanskrit, two vowels cannot come together without coalescing.

4. There are a few cases, in which two vowels though coming together, do not coalesce.

5. When the dual of a noun or a verb ends is ई, ऊ, or ए, these vowels do not combine with another following them; गिरी+आरोहन्ति=गिरी आरोहन्ति. See also 13,37 and 42.

6. ऋ (short), after any vowel except the last four, is optionally not combined, and the preceding vowel, if long, is made short; अर्घ्येण+ऋषिम्=अर्घ्येण ऋषिम् or (by 7)अर्घ्येणर्षिम्. हरिणा+ऋषिः=हरिण ऋषिः or हरिणर्षिः.

7. If अ or आ is followed by इ, उ, ऋ, or ऌ, short or long, the corresponding *guṇa* letter is substituted for both; फल+ई=फले.

8. If ए, ऐ, ओ, or औ follow अ or आ, the vowel which takes the place of both is ऐ in the first two cases and औ in the last two; नृप+औ=नृपौ.

9. When any vowel, short or long, except the last four, is followed by the same vowel, short or long, the substitute for both is the same vowel lengthened; दैत्य+अरि=दैत्यारि, कवि+ईश=कवीश; &c.

10. When इ, उ, ऋ and ऌ, short or long, are followed

by a dissimilar vowel, य्, व्, र्, and ल् are respectively substituted for them; तृणानि+अत्ति=तृणान्यत्ति.

11. When ए or ओ at the end of a word or grammatical form is followed by अ, the latter merges into the former, *i. e* it is neither pronounced nor written. In its place the mark ऽ (अवग्रह) is generally put; रामः+अश्वम्= रामो (by 36)+अश्वम्=रामोऽश्वम्.

12. ए, ओ, ऐ and औ, when followed by a vowel, become अय्, अव्, आय्, and आव् respectively; ने+अ=नय.

13. If a nominal or verbal form ending in ए, ऐ, ओ or औ is followed by a vowel, the य् or व् of the substitute for the former are optionally dropped. The two vowels thus brought together by the dropping of य् or व् do not coalesce; मन्यते+आत्मानम्=मन्यतयात्मानम् or मन्यत आत्मानम्.

Consonants.

14. When there are more consonants than one at the end of a word, the first is retained and the others dropped; as मरुत् with स् becomes मरुत्स्, but स् is dropped and the form is मरुत्.

15. A consonant (except a nasal) at the end of a word is changed to the first or third of its class; मरुत् or मरुद्.

16. Before hard consonants, the preceding consonants, except nasals, substitute the first (*i. e.* hard unaspirate) letter of their class; as ककुभ्+प्रान्त=ककुप्प्रान्त, and दृशद्+पतति=दृशत्पतति.

17. The preceding consonant (except a nasal) takes the third consonant of its class as its substitute, when compounded with a soft consonant or the initial vowel of a word; प्रासादात्+जनम्=प्रासादाद्+जनम् (=प्रासादाज्जनम् by 19).

18. A consonant at the end of a word or grammatical form followed by a nasal is changed to the nasal of its class optionally; as एतद्+मुरारि=एतन्मुरारि or एतद्मुरारि. This change is necessary, when the nasal belongs to a nominal termination, as चित्+मय=चिन्मय.

19. When स् or a consonant of the dental class is compounded with श् or a consonant of the palatal class, a letter of the latter class is substituted for the former, and in this order, *viz.*, श् for स्, च् for त्, ज् for द् &c; अरीन्+जयति=अरीञ्जयति. The same happens when dentals are combined with linguals, ष् being substituted for स्, ट् for त, ड् for थ्, &c.; तत्+टीका=तट्टीका.

20. A consonant of the dental class followed by ल् is changed to ल् (भगवत्+लीला=भगवल्लीला), and न् to a nasal ल्. अस्मिन्+लोके=अस्मिँल्लोके.

21. When ङ्, ण् and न् at the end of a word or grammatical form are preceded by a short vowel and followed by any vowel, they are doubled; वसन्+अम्बरात्=वसन्नम्बरात्.

22. च् or ज् is changed to क् before hard consonants, and to ग् before any soft consonant except a nasal or a semi-vowel; मुच्+त=मुक्त. This change takes place also when these consonants end a word, even before a nasal or semi-vowel; वाच्+यत=वाग्यत.

23. छ् following a vowel is changed to च्छ्; अ+छियन्त =अच्छियन्त. This change takes place optionally when the vowel is long at the end of a word or grammatical form; लक्ष्मी+छाया=लक्ष्मीछाया or लक्ष्मीच्छाया; but after मा (negative particle) and आ (preposition) it is necessary.

24. In the body of a word or grammatical form न् is

changed to an *anusvâra* when followed by श्, ष्, स्, or ह्; विद्वांसौ.

25. A final न् when followed by च्, छ्, त, थ् and ट्, ठ्, is changed to an *anusvâra* and *visarga*; बिडालान्+ताडयति= बिडालां:+ताडयति (=बिडालांस्ताडयति by 39).

26. न् coming ater ऋ, र्, or ष्, in the same word is changed to ण्. This change takes place even if a vowel, a semi-vowel (ल् excepted), the aspirate ह्, or a letter of the guttural or labial class comes between ऋ, र्, or ष् and न्; गृहाणि. This change does not take place when न् ends a word; as नरान्.

27. म् at the end of a word or particle, followed by a consonant in general, is changed to an *anusvâra* optionally, and necessarily when it is followed by श्, ष्, स्, र्, or ह्. When it is not changed to an *anusvâra*, it is changed to the nasal of the class to which the following letter belongs and to a nasal य्, व्, ल्, when followed by य्, व्, ल्, respecively; सम्+गच्छते=संगच्छते or सङ्गच्छते.

28. At the end of words, र्, followed by a hard consonant or by nothing, is changed to a *visarga*; मातर्+पश्य=मातः पश्य.

29. र् followed by र् is dropped, and the preceding vowel (except ऋ,), if short, is made long; धूर्जटिः+रक्षति= धूर्जटिर् (by 38)+रक्षति=धूर्जटी रक्षति.

30. When a word or form ending in any of the first four consonants of a class is followed by श्, the श् is optionally changed to छ्, when it is itself followed by a vowel, a semi-vowel or a nasal; अवदत्+शठः=अवदच् (by 19) शठः or अवदच्छठः.

31. The स् of स्था is dropped after the preposition उद्; उद्+स्था+य=उद्+थाय=उत्थाय by 16.

32. ह् preceded by any of the first four letters of a class is changed to the fourth letter of that class optionally; उद्यमात्+हरेः=उद्यमाद् (by 17)+हरेः=उद्यमाद् हरेः or उद्यमाद्धरेः.

33. The ह् of उपानह् becomes त् and द् in the circumstances mentioned in 22.

34. स् following a vowel except अ and आ, or a letter of the guttural class, or र्, generally becomes ष्; वाच्+सु=वाक् (by 22)+सु=वाक्षु.

35. At the end of words, स् whether followed by any letter or not, is changed to a *visarga*; वदामस्=वदामः.

स् *or Visarga.*

36. When a *visarga* is preceded by अ and followed by अ or a soft consonant, it is changed to उ, which, with the preceding अ, becomes ओ (see 7); नृपः जयति=नृपो जयति.

37. *Visarga* preceded by आ and followed by a vowel or a soft consonant is dropped. It is also dropped when preceded by अ and followed by any vowel except अ. The two vowels, thus brought together by the dropping of *visarga*, do not coalesce; *e. g.*, नरा इमे for नराः इमे; बुध इच्छति for बुधः इच्छति.

38. स् or *visarga* preceded by any vowel except अ or आ, and followed by a vowel or a soft consonant, is changed to र्; नृपतिस्+यजति=नृपतिर्यजति.

39. *Visarga* followed by च् or छ् is changed to श्; by त् or थ् to स्; and by ट् or ठ् to ष्; as हरिश्चरति for हरिः चरति; रामस्तरति, रामष्टीकते.

40. *Visarga* followed by श्, ष् or स् is either retained

or changed to श्, ष्, or स् respectively; ऋषयः+शाम्यन्ति=ऋषयः शाम्यन्ति or ऋषयश्शाम्यन्ति.

41. सः and एषः drop the final स् or *visarga* when followed by a consonant in a sentence; स पुरुषः &c.

42. भोस् drops its स् when followed by a vowel or a soft consonant; भोस्+नृत्यम्=भो नृत्यम्.

MARATHI TRANSLATION OF THE SANDHI RULES.

संधिनियम.

गुण आणि वृद्धि.

१. इ–ईचा गुण ए, उ–ऊचा ओ, ऋ–ॠचा अर्, आणि ऌचा अल्.

२. अची वृद्धि आ, इ–ई–एची ऐ, उ–ऊ–ओची औ, ऋ–ॠची आर्, आणि ऌची आल्.

स्वरसन्धि.

३. संस्कृतांत दोन स्वर एकत्र आले असतां, त्यांचा संयोग (मिलाफ) झाल्यावांचून रहात नाहीं.

४. अशीं कांहीं विशिष्ट स्थळें आहेत, कीं तेथें दोन स्वर एकत्र आले असतांही सन्धि होत नाहीं.

५. शब्दांच्या द्विवचनी रुपाच्या अन्तीं ई, ऊ किंवा ए आल्यास, या स्वरांचा पुढील स्वरांशीं सन्धि होत नाहीं. यासंबंधीं पुढें अंक १३, ३७, व ४२ हे पहा.

६. ए, ऐ, ओ, औ, हे चार स्वर वगळून बाकीच्या कोणत्याही स्वरांपुढें ऋ आल्यास, त्याचा सन्धि न केल्यासही चालतो; आणि अशा वेळीं मागील स्वर दीर्घ असल्यास तो ऱ्हस्व होतो.

७. अ अथवा आ याच्यापुढें इ, उ, ऋ, किंवा ऌ, यांपैकीं कोणताही ऱ्हस्व किंवा दीर्घ स्वर आल्यास, दोन्ही स्वरांऐवजीं त्या स्वराचा गुण योजितात.

८. **अ** किंवा **आ** याच्या पुढें **ए** किंवा **ऐ** असल्यास **ऐ** हा स्वर, आणि **ओ** किंवा **औ** आल्यास **औ** हा स्वर, दोन्ही स्वरांबद्दल येतो.

९. **ए, ऐ, ओ, औ,** हे चार स्वर वगळून बाकीच्या स्वरांपैकीं कोणत्याही ऱ्हस्व किंवा दीर्घ स्वरापुढें पुन्हां तोच स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ आला, तर त्या दोन्ही स्वरांबद्दल तोच दीर्घ स्वर एकटा येतो.

१०. **इ, उ, ऋ, ऌ,** (ऱ्हस्व किंवा दीर्घ) यांच्या पुढें कोणताही असदृश (म्हणजे स्वतांहून वेगळा) स्वर आला असतां, या स्वरांऐवजीं **य्, व्, र्, ल्,** हे वर्ण अनुक्रमें येतात.

११. शब्दाच्या अन्तीं असलेल्या **ए** किंवा **ओ** यांच्यापुढें **अ** आला तर, त्या अचा **ए** किंवा **ओ** मध्यें लय होतो, म्हणजे त्याचा उच्चार होत नाहीं व तो लिहीतही नाहींत; परंतु त्याच्याऐवजीं ऽ (अवग्रह) असें चिन्ह करतात.

१२. **ए, ऐ, ओ, औ,** ह्या स्वरांपुढें कोणताही स्वर आल्यास, या स्वरांचीं **अय्, आय्, अव्, आव्,** अशीं रूपांन्तरें अनुक्रमें होतात.

१३. नामाच्या किंवा धातूच्या रुपांतील अन्त्य **ए, ऐ, ओ,** किंवा **औ,** याच्यापुढें स्वर आल्यास, यांच्या रुपान्तरांतील **य्** आणि **व्** यांचा लोप विकल्पानें होतो, (म्हणजे पाहिजे तर असा लोप करतां येतो,) आणि असा लोप केल्यामुळें जे स्वर एकत्र येतात, त्यांचा मात्र सन्धि होत नाहीं.

व्यञ्जनसन्धि.

१४. शब्दाच्या शेवटीं अनेक व्यञ्जनें आल्यास त्यांतील पहिलें तेवढें शिल्लक राहून, पुढल्या सर्वांचा लोप होतो.

१५. **क**वर्गापासून **प**वर्गापर्यन्तच्या पांच वर्गांतील, अनुनासिक वर्ण सोडून, कोणताहि वर्ण शब्दान्तीं आल्यास त्याऐवजीं त्या वर्गांतील पहिला किंवा तिसरा येतो.

१६. अनुनासिक वर्ण सोडून, **क**वर्गापासून **प**वर्गापर्यन्तच्या पांच वर्गांतील कोणत्याही व्यंजनापुढें कठोर व्यंजन आलें असतां, मागील व्यंजनाऐवजीं त्याच्या वर्गांतील पहिलें (म्हणजे अघोष कठोर) व्यंजन येतें.

१७. अनुनासिक वर्ण वगळून, **क**वर्गापासून **प**वर्गापर्यन्तच्या पांच वर्गांतील कोणत्याही व्यंजनापुढें मृदु व्यंजन किंवा स्वर आल्यास, मागील व्यंजनाऐवजीं त्याच्या वर्गांतील तिसरें (म्हणजे अघोष मृदु) व्यंजन येतें.

१८. शब्दाच्या अन्त्य व्यंजनापुढें अनुनासिक आल्यास, त्या व्यंजनाचें विकल्पानें

त्याच वर्गांतील अनुनासिक होतें. परंतु हें अनुनासिक व्यंजन जर प्रत्ययांतील असेल तर मागील व्यंजन अवश्य अनुनासिक होतें.

१९, **स्** किंवा **त** वर्गांतील व्यंजन याचा **श्** किंवा **च** वर्गांतील व्यंजन याशीं सन्धि करतांना **स्** बद्दल **श्** आणि **त** वर्गाबद्दल **च** वर्ग येतो; तसेंच **ष्** किंवा **ट** वर्गांतील व्यंजन याशीं सन्धि करतांना **स्** बद्दल **ष्** आणि **त** वर्गाबद्दल **ट** वर्ग येतो.

२०. **त** वर्गापुढें **ल**कार आला असतां **त** वर्गाचा **ल** होतो; आणि **न्** बद्दल अनुनासिक **ल्** (म्हणजे ँल्) होतो.

२१. शब्दाच्या अन्तीं असलेल्या **ङ्**, **ण्**, **न्**, च्या मागें ऱ्हस्व स्वर असून पुढें कोणताही स्वर येईल, तर **ङ्**, **ण्**, **न्**, चें द्वित्व होतें.

२२. कठोर व्यंजनापूर्वी **च्** किंवा **ज्**चा **क्** होतो, आणि अनुनासिक वगळून इतर कोणत्याही मृदु व्यंजनापूर्वी त्याचा **ग्** होतो. हीं (म्हणजे **च्** व **ज्**) व्यंजनें शब्दान्तीं असल्यास असा फरक अनुनासिक किंवा अन्तःस्थ (म्हणजे **य्**, **व्**, **र्**, **ल्** हे अर्धस्वर) यांच्यापूर्वीही होतो.

२३. कोणत्याही स्वरापुढें **छ्** चा **च्छ्** होतो. तथापि जर तो स्वर दीर्घ असून शब्दाच्या किंवा शब्दरुपाच्या अन्तीं असेल, तर हें रुपान्तर विकल्पानें होतें. परतु **मा** या निषेधार्थक अव्ययापुढें आणि **आ** या उपसर्गापुढें हें रुपांतर अवश्य आहे.

२४. एकाच शब्दांत किंवा शब्दरुपांत **न्** च्या पुढें **श्**, **ष्**, **स्**, किंवा **ह्** आल्यास, **न्**चा अनुस्वार होतो.

२५. शब्दान्तींच्या **न्**च्या पुढें **च्**, **छ्**, **त्**, **थ्**; आणि **ट्**, **ठ्**, आल्यास **न्**चा **अनुस्वार** व **विसर्ग** होतो.

२६. एकाच शब्दामध्यें **ऋ**, **र्**, किंवा **ष्** यांच्यापुढें **न्** आला असतां, त्या **न्**चा **ण्** होतो. **ऋ**, **र्** किंवा **ष्** आणि **न्** यांच्या मध्यन्तरीं (१) स्वर, (२) **ल्** वगळून कोणताही अर्धस्वर (म्हणजे **य्**, **व्**, **र्**), (३) महाप्राण **ह्**, आणि (४) **क** किंवा **प** वर्गांतील वर्ण, या चोहोंपैकीं कितीही व कोणतेही वर्ण आले, तरी **न्**चा **ण्** होतो: मात्र **न्** पदान्तीं असल्यास **ण्** होत नाहीं.

२७. **म्** पदान्तीं असून त्याच्यापुढें (१) **क** वर्गापासून **प** वर्गापर्यन्त कोणत्याहि वर्गांतील वर्ण असल्यास **म्**चा अनुस्वार होतो किंवा **म्** ऐवजीं त्या वर्गांतील अनुनासिक वर्ण येतो; (२) **य्**, **व्**, **ल्**, हे वर्ण आल्यास **म्**चा अनुनासिक **य्**, **व्**, **ल्**, अनुक्रमें होतो; (३) **श्**, **ष्**, **स्**, **र्**, **ह्** हे वर्ण आल्यास **म्**चा अनुस्वार अवश्य होतो.

२८. पदान्तींच्या **र्** पुढें कठोर व्यंजन असल्यास किंवा कांहींच नसल्यास **र्**चा विसर्ग होतो.

२९. **र्**च्या पुढें **र** आला असतां, त्याचा लोप होतो, व मागील स्वर (**ऋ**हून अन्य असून) र्‍हस्व असल्यास दीर्घ होतो.

३०. अनुनासिक वर्ग वगळून, **क** वर्गापासून **प** वर्गापर्यन्तच्या पांची वर्गांतील कोणत्याही वर्गाचें कोणतेंही व्यंजन पदाच्या अन्तीं असून त्याच्यापुढें **श्** आला, तर त्या **श्**चा विकल्पानें **छ्** होतो, मात्र त्या **श्**च्या पुढें स्वर, अर्धस्वर, किंवा अनुनासिक वर्ण असला पाहिजे.

३१. **उद्** या उपसर्गापुढें **स्था** धातूच्या **स्**चा लोप होतो.

३२ अनुनासिकें वगळून, **क** वर्गापासून **प** वर्गापर्यन्तच्या पांच वर्गांतील कोणत्याहि व्यंजनापुढें **ह्** आल्यास **ह्**चा त्या व्यंजनाच्या वर्गांतील चवथा वर्ण (म्हणजे सघोष मृदु वर्ण) विकल्पानें होतो.

३३. उपानह् शब्दांतील **ह्**चा, वरील ३२ व्या नियमांत सांगितलेल्या प्रसंगीं, **त्** आणि **द्** होतो.

३४. **स्** च्यापूर्वी **अ** व **आ** हे वगळून इतर कोणताही स्वर असल्यास, किंवा **क** वर्गांतील वर्ण अथवा **र्** असल्यास, **स्**चा बहुतकरून **ष्** होतो.

३५. शब्दान्तीं **स्** येऊन त्यापुढें कोणताही वर्ण आला किंवा कांहींच आलें नाहीं, तरी **स्**चा **विसर्ग** होतो.

विसर्गसन्धि

३६. **विसर्गा**च्या मागें **अ** असून, जर पुढें **अ** अथवा कोणतेंही मृदु व्यंजन आलें असेल, तर त्या विसर्गाचा **उ** होतो, आणि हा **उ** (नियमाङ्क ७ प्रमाणें) मागील **अ**शीं संयोग पावून **ओ** होतो.

३७. **विसर्गा**च्या मागें **आ** असून, जर पुढें कोणताही स्वर किंवा मृदु व्यंजन आलें असेल, तर त्या विसर्गाचा लोप होतो. तसेंच, विसर्गाच्यामागें **अ** असून, पुढें **अ** शिवाय कोणताही स्वर आला, तरीही त्या विसर्गाचा लोप होतो. परंतु अशा विसर्गलोपामुळें जे स्वर बाकी राहून एकत्र येतात, त्यांचा संधि होत नाहीं.

३८. **स्**च्या किंवा विसर्गाच्या मागें **अ–आ** शिवाय कोणताही स्वर असून, त्याच्यापुढें एकादा स्वर किंवा मृदु व्यंजन आलें, तर त्या **स**चा अथवा विसर्गाचा **र्** होतो.

३९. विसर्गाच्या पुढें च्, छ् आल्यास विसर्गाचा श् होतो, त्, थ् आल्यास स् होतो, आणि ट्, ठ् आल्यास ष् होतो.

४०. विसर्गाच्या पुढें श्, ष्, स् आल्यास, तो विसर्ग अविकृत राहतो, किंवा त्याचा अनुक्रमें श्-ष्-स् विकल्पानें होतो.

४१. वाक्यामध्यें सः आणि एषः या शब्दरूपांतील अन्त्य स्‌च्या किंवा विसर्गाच्यापुढें कोणतेंही व्यंजन आल्यास, त्या स्‌चा किंवा विसर्गाचा लोप होतो.

४२ भोस् या शब्दापुढें कोणताही स्वर किंवा मृदु व्यंजन आलें असतां स्‌चा लोप होतो.

Notes. टिप्पणी.

4 The cases in which two vowels coming together do not coalesce, are called *pragrihya.* (जेथें दोन स्वर एकत्र येऊनही त्यांचा संधि होत नाहीं, त्या स्थळाला **प्रगृह्य** म्हणतात.)

28. If the र् is followed by a vowel or a soft consonant, it is taken as र् and combined with the following letter. (जर या र् च्या पुढें एकादा स्वर किंवा मृदु व्यंजन आलें तर तो र्‌च समजून त्याचा पुढील अक्षरांशीं संधि करावा.) As, पुनरागमनम् । पुनर्जीवनम् । मातर्भवानि ।

29. This rule is also applicable to ढ्. (हा नियम ढ्‌लाही लागू आहे.) As, लिढ्+थ=लिढ्+ढ=लीढ.

30. This rule is also applicable if the श् is followed by ह्. (श् च्या पुढें ह् आल्यासही हा नियम लागू आहे.)

We reproduce below the rules of Syntax noted in the Appendix to the First Book, together with their translations.

SYNTAX.

1. There are some roots that govern two accusatives; नी, प्रच्छ् and याच् are instances. The synonyms of these also govern two; सैनिकान् नगरं नयति.

2. कथ् sometimes govern two accusatives, or the

indirect object may be in the dative or genitive case; नृपं, नृपाय or नृपस्य कथयति वार्ताम्.

3. Verbs implying motion govern the accusative, and sometimes the dative, of the place to which the motion is directed; नगरं or नगराय गच्छामि.

4. **विना** governs an accusative, instrumental or ablative. वधं, वधेन, or वधाद् विनारिर्न शाम्यति.

5. **सह** governs the instrumental; पुत्रैः सह.

6. **रुच्** and other verbs having the same sense govern the dative of the person or thing pleased or satisfied; मोदको बालकाय रोचते.

7. Verbs implying anger, malice, rivalry and jealousy (*i. e.*, having the sense of **क्रुध्**, **द्रुह्**, **ईर्ष्या** and **असूया**) govern the dative of the person or thing against whom or which the feeling is directed; हरये कुप्यति. **स्पृह्** also governs the dative of the object of wish; मोदकेभ्यः स्पृहयति.

8. **धृ** in the sense of 'to owe' governs the dative of the person to whom something is owing; निष्कान् धारयति रामाय.

9 **नमः** and **स्वस्ति** govern the dative; नमो देवेभ्यः.

10. **च** or **वा** is used after each of the parts of speech joined together, or once only, that is, after them all: हरिश्च गोविन्दश्च or हरिर्गोविन्दश्च जल्पतः

वाक्यरचना.

१. कांहीं धातु दोन कर्मे घेतात; उदाहरणार्थ, **नी**, **प्रच्छ्**, **याच्**. या धातूंचे समानार्थक धातुही दोन कर्मे घेतात.

२. **कथ्** धातूचा कित्येक वेळां दोन कर्मांशीं प्रयोग होतो, किंवा गौणकर्म चतुर्थ्यन्त किंवा षष्ठ्यन्त योजण्यांत येतें.

३. गतिदर्शक धातूंचा ज्या स्थळाकडे किंवा पदार्थाकडे गतीचा रोंख असेल, त्याच्या द्वितीयेशीं, आणि कधीं कधीं चतुर्थीशींही प्रयोग होतो.

४. **विना** या अव्ययाचा द्वितीया, तृतीया, किंवा पंचमी, या विभक्तींशीं प्रयोग होतो.

५. **सह्**चा तृतीयेशीं प्रयोग होतो.

६. **रुच्** व त्याशीं समानार्थक असलेले धातु, यांचा ज्याला आवड असेल त्याच्या चतुर्थीशीं प्रयोग होतो.

७ **क्रुध्**, **द्रुह्**, **कुप्**, हीं क्रियापदें व यांसारखींच दुसरीं राग, द्वेष, मत्सर, हेवा, हे विकार दर्शविणारीं क्रियापदें, यांचा प्रयोग, हे विकार ज्या व्यक्तीविरुद्ध किंवा वस्तूविरुद्ध उत्पन्न झाले असतील, त्या व्यक्तिदर्शक किंवा वस्तुदर्शक नामाच्या चतुर्थीबरोबर होतो. **स्पृह्** धातूचाही इच्छाविषय दर्शविणाऱ्या नामाच्या चतुर्थीबरोबर प्रयोग होतो.

८. **धृ** (देणें असणें) या धातूचा धनको दाखविणाऱ्या नामाच्या चतुर्थीबरोबर प्रयोग होतो.

९. **नमः** व **स्वस्ति** या अव्ययांचा चतुर्थीबरोबर प्रयोग होतो.

१०. **च** किंवा **वा**, हीं अव्ययें त्यांनीं जोडलेल्या प्रत्येक शब्दापुढें योजण्यांत येतात; अथवा अशा जोडलेल्या शब्दांपैकीं फक्त शेवटच्या शब्दापुढें त्यांचा प्रयोग एकदांच केला तरी चालतो.

ADDITIONAL RULES. अधिक नियम.

11. **अपि** (even), **इव** (like, as), **एव** (only), **च**, **वा**, **पुनर्** (again) and **तु** (but)–these particles are never used at the beginning of a sentence, nor are they used before the word with which they are connected (अपि, इव, एव, च, वा, पुनर्, आणि तु, या अव्ययांचा प्रयोग वाक्याच्या आरंभीं कधींही होत नाहीं: त्याचप्रमाणें त्यांचा ज्या शब्दांशीं अन्वय व्हावयाचा असतो, त्या शब्दांपूर्वीं तीं योजण्यांत येत नाहींत.) *e. g.* उदारस्य वित्तं तु तृणमिव शूरस्यापि च मरणं तृणमिव । तातस्य वचनं स्मरसि तथा तु नाचरसि । तातस्य वचनं स्मरसि किन्तु तथा नाचरसि ।

12. To express negation अ is prefixed to words beginning with a consonant and अन् to words beginning with

a vowel. (व्यंजनारंभित शब्दांना **अ** व स्वरारंभित शब्दांना **अन्** हा **न**कारार्थी किंवा विरुद्धार्थी आगम आरंभीं लावण्यांत येतो.) e. g. विनयः--अविनयः । ऋणम्-अनृणम् । ऋतम्-अनृतम् । उदारः-अनुदारः ।

13. प्र + मद् (to err, to fall off,) is used with the ablative of that in which one has erred or from which one has fallen off. (प्र+मद् या धातूचा ज्या गोष्टींत चूकभूल झाली असेल तिच्या पंचमीशीं प्रयोग होतो.) e g. शुभादाचारान्मा प्रमाद्य ।

14. A noun with a participial adjective qualifying it, is used in the locative or genitive absolutely; the locative absolute generally shows the time at which certain other event takes place. (कधीं कधीं नाम व त्याचे धातुसाधित विशेषण यांचा प्रयोग अन्वयहीन षष्ठी किंवा सप्तमी विभक्तींत होतो. अशा अनन्वित सप्तमीनें त्या क्रियेशीं मुख्य वाक्यांतील क्रिया समकालीन किंवा उत्तरकालीन आहे असें दाखविलें जातें. हिला **सतिसप्तमी** म्हणतात.) Thus, दिनेषु गच्छत्सु नारायणः पण्डितोऽभवत्=As days went on (or days having elapsed) नारायण became learned. नृपे मृते महिषी प्राणानत्यजत्=The king being dead (or when the king died) his queen abandoned her life. The genitive absolute has the sense of " notwithstanding, " " although " or " in spite of ". (अनन्वित षष्ठीनें दुसरी क्रिया तिच्याशीं समकालीन आहे व विशेषतः ह्या दुसऱ्या क्रियेंत पहिल्या क्रियेबद्दल अनादर आहे असें दर्शविलें जातें.) Thus, गुरोः पश्यतः शिष्येणाविनयः कृतः=Notwithstanding that the teacher was looking on (or in spite of the teacher looking on) the pupil acted rudely.

15. **भवत्** (pro.) means "your honour" (भवती f), but it is always used in the third person. [भवत्=आपण, तुम्ही, (भवती स्त्री०) या सर्वनामाचा अर्थ जरी द्वितीय पुरुषी आहे, तरी तें वाक्यरचनेला तृतीय पुरुषीच गणलें जातें.] e. g. त्वं वनं गच्छ । But भवान् वनं गच्छतु ।

16. **आत्मन्** as a reflexive pronoun is always used in the masculine gender and singular number. (आत्मन्= आपण, स्वतः, या सर्वनामाचा प्रयोग नेहमीं पुल्लिंगी एकवचनीच होत असतो.); e. g. आत्मानं बहु मन्यन्ते ताः प्रमदाः=Those young women think highly of themselves. (त्या तरुण स्त्रिया स्वतांला फार मोठ्या समजतात.) Here आत्मानम् is masculine and singular, although प्रमदाः is feminine and plural. (येथें प्रमदाः हें नाम स्त्रीलिंगी व बहुवचनी असूनही आत्मानम् हें पुल्लिंगी व एकवचनीच आहे.)

Lessons. I-IV.

Sanskrit Roots are divided into 10 groups called गणs or conjugations. In almost every conjugation a root has a certain termination added to it; this termination is called the conjugational sign. In some cases the conjugational sign causes some vowel changes in the root; in such a case the sign is said to be strong; otherwise, it is called weak. The root with the conjugational sign forms the Base (अंग) to which are added the terminations of tenses and moods. (संस्कृतांतील धातूंचे दहा वर्ग करतात; यांस 'गण' म्हणतात. बहुशः प्रत्येक गणांत धातूला एक प्रत्यय लावण्यांत येतो, त्याला 'गणप्रत्यय' असें नांव आहे. कांहीं गणप्रत्ययांपूर्वी धातूंतील स्वरांमध्ये विकार होतात; अशा प्रत्ययांस 'कठोर' किंवा 'विकारी' म्हणतात; इतरांना 'मृदु' किंवा 'अविकारी' ही संज्ञा आहे. धातूला गणप्रत्यय लागून जें रूप तयार होतें, त्याला 'अंग' म्हणतात, आणि या अंगाला काळांचे व अर्थांचे प्रत्यय जोडण्यांत येतात.)

In this book the roots of 1st, 4th, 6th, and 10th conjgations only are treated, and the following table gives their conjugational signs, stating which of them are strong and which are weak. (या पुस्तकांत फक्त पहिला, चवथा, सहावा, व दहावा इतक्या गणांतीलच धातूंचा विचार केला आहे; आणि पुढील

कोष्टकांत या गणांचे प्रत्यय असून, त्यांतील कोणते 'विकारी' व कोणते 'अविकारी' आहेत तें दर्शविलें आहे.)

Conj. गण.	Conj. sign. गणप्रत्यय.	strong or weak. विकारी व अविकारी.
1st. १ ला.	अ	विकारी
2nd. २ रा.	none	—
4th. ४ था.	य	अविकारी
6th. ६ वा.	अ	अविकारी
10th. १० वा.	अय	विकारी

CHANGES BEFORE THE STRONG CONJUGATIONAL SIGNS.

(विकारी गणप्रत्ययांपूर्वी धातूंस होणारे विकार)

(1st conj. प्रथम गण.) Before the conjugational sign (अ) the final vowel or penultimate short vowel of a root takes गुण. [गणप्रत्ययापूर्वी (म्हणजे 'अ' पूर्वी) धातूंतील अन्त्य स्वर किंवा उपान्त्य ऱ्हस्व स्वर 'गुण' घतो.]

(10th conj. दशम गण.) Before the conjugational sign (अय) (i) the final vowel or penultimate अ of a root takes वृद्धि, (ii) the penultimate short vowel (except-

ing अ) takes गुण. Some roots like गण्, कथ्, रच्, प्रथ्, are exceptions to (i), i. e. their अ does not take वृद्धि; and some roots like स्पृह्, मृग्, are exceptions to (ii), i. e. their penultimate short vowel (ऋ) does not take गुण. (णप्रत्यय ' अय ' याच्यापूर्वी धातूंतील (१) अन्त्य स्वर किंवा उपान्त्य अ ' वृद्धि ' घेतो; अथवा (२) उपान्त्य ऱ्हस्व स्वर (' अ ' शिवाय करून) ' गुण ' घेतो. गण्, कथ्, रच्, प्रथ्, यांसारखे कांहीं धातु (१) ला अपवाद आहेत, म्हणजे त्यांचा उपान्त्य अ ' वृद्धि ' पावत नाहीं; आणि स्पृह्, मृग् यांसारखे कांहीं धातु (२)-ला अपवाद आहेत, म्हणजे त्यांचा उपान्त्य ऱ्हस्व स्वर (ऋ) ' गुण ' घेत नाहीं.)

For *Guna* and *Vridhhi* see Nos. I & 2 under *Sandhi* Rules. (गुण व वृद्धि यांच्या माहितीसाठीं संधिनियमाङ्क १ व २ पहा.)

In Sanskrit verbs have (1) tense and mood, (2) voice, (3) person, and (4) number. There are three persons–first, second, and third; and three numbers–singular, dual, and plural. The dual number shows two, and plural more than two. (संस्कृत क्रियापदांना (१) काळ व अर्थ, (२) प्रयोग, (३) पुरुष, व (४) वचन, हीं असतात. पुरुष तीन आहेत. प्रथम, द्वितीय, आणि तृतीय. वचनें तीन आहेत; एकवचन, द्विवचन, व बहुवचन. द्विवचन दोन संख्या दाखवितें, आणि बहुवचन दोहोंहून अधिक संख्या दाखवितें.) Besides, there are two sets of terminations for all tenses and moods, one of them is called the परस्मैपद and the other आत्मनेपद. Some roots take only the first, some only the second, and others both, and they are called परस्मैपदी, आत्मनेपदी, and उभयपदी respectively. (शिवाय, संस्कृतांत काळांच्या व अर्थांच्या प्रत्ययांचे दोन संच आहेत, त्यांपैकीं एकास परस्मैपद व दुसऱ्यास आत्मनेपद अशा संज्ञा आहेत. कांहीं धातु पहिलें पद, कांहीं दुसरें, आणि कांहीं दोन्ही पदें घेतात, आणि त्यांस अनुक्रमें परस्मैपदी, आत्मनेपदी, व उभयपदी धातु म्हणतात.)

SPECIAL RULES OF INTERNAL SANDHI.

(अन्तःसंधीचे विशेष नियम.)

(i) The final अ of a verbal base is dropped before a termination beginning with अ. (अकार ज्यांच्या आरंभीं आहे, अशा प्रत्ययांपूर्वी धातूंच्या अंगाच्या अन्त्य अचा लोप होतो.)

(ii) The final अ of a base becomes आ before a termination beginning with म् or व्. (म् किंवा व् ज्यांच्या आरंभीं आहे, अशा प्रत्ययांपूर्वी अंगाच्या अन्त्य अचा आ होतो.

परस्मैपदी { Terminations of the Present Tense. (वर्तमान काळाचे प्रत्यय.)

Person पुरुष		Sing ए. व.	Dual द्वि. व.	Plural ब. व.
1st	प्रथम	मि	वस्	मस्
2nd	द्वितीय	सि	थस्	थ
3rd	तृतीय	ति	तस्	अन्ति

APPLICATION OF THE ABOVE GRAMMAR PORTION.

(वरील व्याकरणभागाचीं उदाहरणें).

Roots & Conj. धातु व गण.	Conj. Sign. गण-प्रत्यय	Changes विकार	Base अंग	Some Termi. कांहीं प्रत्यय.	Forms. रूपें.
बुध् १	अS.	बोध्+अ	बोध	मि, वस्, अन्ति	बोधामि, बोधावः ii 35,* [बोधन्ति
भू १	,,	भो+अ	भव12	,, ,, ,,	भवामि, भवावः, भवन्ति
गम्(गच्छ्) १	,,	गच्छ्+अ	गच्छ	,, ,, ,,	गच्छामि, गच्छावः, गच्छन्ति
सृ १	,,	सर्+अ	सर	,, ,, ,,	सरामि, सरावः, सरन्ति
नी १	,,	ने+अ	नय१२	सि, मस्, तस्	नयसि,नयामःii35,नयतः35

*The numbers are of *Sandhi* Rules. (आंकडे संधिनियमाचे आहेत.)

नश्४ यW.नश्+य नश्य सि,मस्,तस् नश्यसि, नश्यामः, नश्यतः
मुह् ४ ,, मुह्+य मुह्य ,, ,, ,, मुह्यसि, मुह्यामः, मुह्यतः
प्रच्छ्(पृच्छ्)६अW.पृच्छ्+अ पृच्छ ,, ,, ,, पृच्छसि, पृच्छामः, पृच्छतः
स्पश् ६ अW.स्पृश्+अ स्पृश ,, ,, ,, स्पृशसि, स्पृशामः, स्पृशतः.
घुष् १० अयS घोष्+अय घोषय ,, ,, ,, घोषयसि, घोषयामः, घोषयतः.
तड् १० ,, ताड्+अय ताडय ति,थस्,अन्ति ताडयति, ताडयथः 35, ताडयन्ति i
पीड् १० ,, पीड्+अय पीडय ,, ,, ,, पीडयति, पीडयथः, पीडयन्ति.
पा (पिब्) १ अS पिब्+अ पिब ,, , ,, पिबति, पिबथः, पिबन्ति.
सिच्(सिञ्च्)६अWसिञ्च्+अ सिञ्च ,, ,, ,, सिञ्चति, सिञ्चथः, सिञ्चन्ति.

ROOTS OF THE 2nd CONJ. (दुसऱ्या गणाचे धातु).

अस् (to be)—अस्मि, स्वः, स्मः, । असि, स्थः, स्थ । अस्ति, स्तः, सन्ति, ।
अद् (to eat)—अद्मि, अद्वः, अद्मः । अत्सि, अत्थः, अत्थ । अत्ति, अत्तः, अदन्ति ।

\+ + + +

Students should learn by heart the model forms given on page 11 of the First Book, and similarly conjugate other roots, forming the correct base in each case. (पहिल्या पुस्तकाच्या ११ व्या पानावर नमुन्यासाठीं दिलेलीं धातुरूपें विद्यार्थ्यांनीं पाठ करावीं, आणि त्यांच्या धोरणावर इतर धातु चालवावे; मात्र धातु चालविण्यापूर्वी त्याचें अंग नियमानुसार बरोबर सिद्ध केलें पाहिजे.)

LESSON I.

I speak (मी बोलतों). Thou protectest (तूं रक्षण करतोस). He, she or it falls (तो, ती किंवा तें पडतें). Thou knowest (तूं जाणतोस-तेस-तेंस). Thou movest (तूं हलतोस). I carry (मी नेतों). Thou dwellest (तूं रहातोस). I move (मी सरतों). He goes (तो जातो). I eat (मी खातों). He carries (तो नेतो).

I know (मी जाणतों). He becomes (तो होतो). He eats (तो खातो). He is (तो आहे).

वदसि । वदति । गच्छसि । गच्छामि । वसति । वसामि । पतसि । चलसि । बोधति । नयसि । सरति । भवामि । अस्ति । अस्मि । असि । जीवति । त्यजति । नमसि । पचामि । दहसि । रक्षामि । चलति । जीवामि । पचति । त्यजामि ।

Lesson II.

We speak (आम्ही बोलतों). They go (ते जातात). You know (तुम्ही जाणतां). We carry (आम्ही नेतों). You become (तुम्ही होतां). They Dwell (ते रहातात). You are (तुम्ही आहां). They eat (ते खातात). We burn (आम्ही जाळतों). They are (ते आहेत). You live (तुम्ही जिवंत आहां). They bow (ते नमस्कार करतात). We nourish (आम्ही पोसतों). They perish (ते नष्ट होतात). You dance (तुम्ही नाचतां). We faint (आम्ही मोह पावतों). They covet (ते लोभ पावतात). We touch (आम्ही शिवतों). You create (तुम्ही उत्पन्न करतां). They wish (ते इच्छितात). You ask (तुम्ही विचारतां). We leave (आम्ही सोडतों). They enter (ते शिरतात).

वदथ । गच्छामः । बोधन्ति । नयथ । भवन्ति । वसामः । अस्थ । स्मः । दहन्ति । जीवामः । तुदन्ति । जीवथ । पुष्यन्ति । नश्यामः । नृत्यन्ति । मुह्यथ । लुभ्यामः । स्पृशन्ति । जयामः । हरथ । पश्यन्ति । अस्यामः । पिबामः । यजथ । वहन्ति । स्मरामः । क्षिपथ । श्लिष्यन्ति । तुष्यामः । शुष्यन्ति । लुठ्यथ । सिञ्चथ ।

Lesson III.

We two steal (आम्ही दोघे चोरतों). You two give pain (तुम्ही दोघे दुःख देतां). They two tell (ते दोघे सांगतात). We two count (आम्ही दोघे मोजतों). We two publish (आम्ही दोघे प्रसिद्ध करितों). They two arrange (ते दोघे रचितात). We two eat

(आम्ही दोघे खातों). You two proclaim (तुम्ही दोघे जाहीर करतां). We two desire (आम्ही दोघे इच्छा करितों). They two contemplate (ते दोघे विचार करितात). You two please (तुम्ही दोघे खूष करितां). They two go (ते दोघे जातात). We two carry (आम्ही दोघे नेतों). They two enter (ते दोघे शिरतात). You two bow (तुम्ही दोघे नमस्कार करतां). We two remember (आम्ही दोघे आठवतों). You two conquer (तुम्ही दोघे जिंकतां). They two perish (ते दोघे मरतात). We two dance (आम्ही दोघे नाचतों). They two wish (ते दोघे इच्छितात). They two are (ते दोघे आहेत).

चोरयथः । पीडयतः । कथयावः । गणयथः । पश्यतः । रचयावः । स्पृहयथः । घोषयतः । चिन्तयावः । प्रथयथः । प्रीणयतः । निन्दावः । कुप्यथः । कृषतः । पूजयावः । अटथः । क्षुभ्यतः । उञ्छावः । वर्णयतः । श्लिष्यावः । जल्पथः । सान्त्वयतः । शंसावः । वदथः । भवतः । पचथः । बोधावः । अत्तः । तुष्यावः । लुभ्यथः । लुठ्यतः । स्पृशावः । पृच्छथः ।

Lesson IV.

Thou speakest (तूं बोलतोस). You dwell (तुम्ही राहतां). We know (आम्ही जाणतों). He protects (तो रक्षितो.). I fall (मी पडतों). They lead (ते नेतात). You two eat (तुम्ही दोघे खातां). They are (ते आहेत). Thou perishest (तूं नाश पावतोस). He dances (तो नाचतो). We enter (आम्ही शिरतों). You two ask (तुम्ही दोघे विचारतां). He is silly (तो वेडगळ आहे). I wish (मी इच्छितों). You leave (तुम्ही सोडतां). He touches (तो शिवतो). You remember (तुम्ही स्मरतां). They two bear (ते दोघे वहातात). He sprinkles (तो शिंपडतो). They wallow (ते लोळतात). I am satisfied (मी संतुष्ट आहें). You two throw (तुम्ही दोघे फेंकतां). I tell (मी सांगतों). You praise (तुम्ही स्तुति करितां).

Thou beatest (तूं मारतोस). They grow (ते वाढतात). He **worships** (तो पूजा करितो). I stand (मी उभा राहतों). You desire (तुम्ही इच्छितां). He washes off (तो धुतो). They two waste away (ते दोघे झिजतात). I eat (मी खातों). We live (आम्ही रहातों). You abandon (तुम्ही सोडतां). They cook (ते रांधतात). I nourish (मी पोसतो). They two take away (ते दोघे हरण करितात). Thou conquerest (तूं जिंकतोस). They drink (ते पितात). We two see (आम्ही दोघे पाहतों). He calls (तो बोलावितो). They give pain (ते दुःख देतात). We worship (आम्ही पूजितों). I am weary (मी थकलों आहें). You proclaim (तुम्ही जाहीर करतां). He counts (तो मोजतो). We plough (आम्ही नांगरतों). They melt (ते वितळवितात). He thinks (तो विचार करतो).

पुष्यति । नृत्यामि । लुम्पथ । विशति । इच्छसि । यजामि or पूजयामि । पीडयसि । रोहति । । ह्वयामः । मुह्यति । तुष्यन्ति । जयामि । गच्छथ । श्राम्यसि । स्पृहयामि । पिबावः । दहथः । क्षालयन्ति । क्षयति । कथयति । तोलयति । चोरयन्ति । रचयथ । घोषयति । स्मरामि । वसतः । हरामः । कथयथ । स्पृशसि । वाञ्छन्ति । गच्छथः । चोरयति । स्वः । प्रीणयसिं । विशामि । ताडयन्ति । पचावः । यजथ ।

Lessons V–IX.

In Sanskrit nouns have gender, number, and case. The gender of a noun is fixed by usage. There are three numbers-singular, dual, and plural. (संस्कृतांत नामाला लिंग, वचन, व विभक्ति, हीं असतात. नामाचें लिंग वहिवाटीनें ठरलेलें असतें. वचनें तीन आहेत-एकवचन, द्विवचन, आणि बहुवचन.)

There are seven cases: Nominative (nom.), Accusative (acc.), Instrumental (ins.), Dative (dat.), Ablative (abl.) Genitive (gen.), Locative (loc.), and Vocative (voc.). The nominative is generally the subject of a verb, and the accusative its object. The instrumental shows the means, instrument, or agent of an action. The dative shows the person or thing towards whom or which the action is directed. The ablative indicates separation; the genitive, ownership or some relation; and the locative, time and place. The meanings of the several cases are expressed in English, by the words shown below:—

Ins.—by, with, through, by means of, etc.

Dat.—to, towards, for, for the sake of, with the intention of, etc.

Abl.—from, away from, out of, than, etc.

Gen.—of, out of, belonging to, etc.

Loc.—in, on, upon, over, at, in place of, etc.

विभक्त्या सात आहेत; प्रथमा (प्र०), द्वितीया (द्वि०), तृतीया (तृ०), चतुर्थी (च०), पंचमी (पं०), षष्ठी (ष०), सप्तमी (स०), संबोधन (सं०). प्रथमा ही बहुशः क्रियेचा कर्ता दाखविते, व द्वितीया कर्म दाखविते. तृतीयेनें क्रियेच्या साधनाचा, रीतीचा, करणाचा, वगैरे बोध होतो. क्रिया कोणासाठीं किंवा कोणाच्या उद्देशानें होत आहे हें चतुर्थी सांगते. पंचमीवरून अपादान (=वियोग, ताटातूट), षष्ठीवरून स्वामित्व किंवा कांहीं संबंध, आणि सप्तमीवरून स्थलकाल हीं समजतात. या निरनिराळ्या विभक्त्यांचे अर्थ मराठींत त्या त्या विभक्तीनेंच दर्शविले जातात, किंवा खालील शब्दांचाही उपयोग केला जातो:—

तृ०—द्वारें, मुळें इ०; च०—करितां, साठीं, कडे, इ०; पं०—पासून, पेक्षां, उद्देशें, योगें, इ०; स०—आंत, खालीं, वर, ठायीं, ठिकाणीं, इ०).

CASE TERMINATIONS (विभक्ति प्रत्यय).

Case विभक्ति	For nouns ending in अ. ('अ'कारान्त शब्दांकरितां)		For nouns ending in इ. ('इ'कारान्त शब्दांकरितां)	
	Mass. पुल्लिंगी. S. D. P ए. द्वि. ब.	Neu. नपुंसक. S. D P. ए. द्वि ब.	Mass. पुल्लिंगी S. D. P. ए. द्वि. ब.	Neu नपुंसक. S D. P. ए. द्वि. ब.
Nom प्र.	स् औ अस्	म् ई आनि	स् – अस्	– ई इ
Acc. द्वि.	म् औ आन्	म् ई आनि	म् – न्	– ई इ
Ins. तृ.	S. D. P. इन भ्याम् ऐस्		ना भ्याम् भिस्	आ भ्याम् भिस्
Dat. च.	य भ्याम् भ्यस्		ए भ्याम् भ्यस्	ए भ्याम् भ्यस्
Abl. पं.	आत् भ्याम् भ्यस्		अस् भ्याम् भ्यस्	अस् भ्याम् भ्यस्
Gen. ष.	स्य ओस् नाम्		अस् ओस् नाम्	अस् ओस् नाम्
Loc. स.	इ ओस् सु		औ ओस् सु	इ ओस् सु
Voc. सं.	S. D. P. – औ अस्	S. D. P. – ई आनि	– – अस्	– ई इ

In adding these case-terminations the following special Internal *Sandhi* Rules should be applied in addition to those already given. (हे विभक्तिप्रत्यय नामांना लावण्यापूर्वी मागें दिलेल्या संधिनियमांशिवाय आणखीं पुढील अन्तःसंधिनियमही लावण्यांत यावे.)

SPECIAL RULES APPLICABLE TO NOUNS ENDING IN अ.

(अ-कारान्त नामांस लावण्याचे विशेष नियम.)

(i) The final अ of the noun is lengthened before भ्याम् and य; (नामाचा अन्त्य ' अ ' ' भ्याम् ' व ' य ' पूर्वी दीर्घ म्ह० ' आ ' होतो.) वायस-वायसाभ्याम् । कमल-कमलाय ।

(ii) The final अ of the noun is changed to ए before भ्यस् and ओस्. (नामाचा अन्त्य ' अ ' ' भ्यस् ' व 'ओस्' पूर्वी ' ए ' होतो.) दुःख-दुःखेभ्यः । बुध+ओस्=बुधे+ओस्=बुधय्+ओस् (S. R. 12.)=बुधयोः । हृदय-हृदययोः । समुद्र-समुद्रयोः ।

SPECIAL RULES APPLICABLE TO NOUNS ENDING IN इ.

(इ-कारान्त नामांस लावण्याचे विशेष नियम.)

(a) Masculine nouns (पुल्लिंगी नामें).

(i) The final इ is lengthened in nom. and acc. dual and before tha न् of acc. plural (प्र० व द्वि० विभक्तींच्या द्विवचनांत व द्वि० विभक्तीच्या अनेकवचनीं ' न् ' पूर्वी ' इ ' दीर्घ होते). हरि-हरी । नृपति-नृपतीन् ।

(ii) The final इ of the noun is *gunated* before अस्, and ए and in vocative sing. The ' अ ' of Abl. and Gen. sing. अस् is dropped before ए. (नामाच्या अन्त्य ' इ ' चा ' अस् ' व ' ए ' पूर्वी आणि संबोधनी एकवचनांत गुण होतो; पं० व ष० विभक्तींच्या एकवचनी ' अस् 'च्या ' अ 'चा एपूर्वी लोप होतो.) व्याधि-व्याधयः 12 । उदधि-उदधये । मणि-मणेः । राशि-राशेः ।

(iii) The final इ of the noun is dropped before औ. (' औ ' पूर्वी नामाच्या अन्त्य ' इ ' चा लोप होतो) मणि-मणौ.

(b) Neuter nouns (नपुंसकलिंगी नामें)

(i) न् is added to the noun before terminations beginning with a vowel. (इ-कारान्त नपुंसकलिंगी नामांना स्वरारंभित प्रत्ययांपूर्वी ' न् ' लागतो.) वारि-वारिन्+ई=वारिणी 26. वारिन्+अस्=वारिणः 26,35.

(ii) इ is lengthened in nom. and acc. plurals. (प्र० व द्वि० बहुवचनांत ' इ ' दीर्घ होते.) वारि-वारीन्+इ=वारीणि 26.

(iii) In voc. sing. इ is optionally *gunated* (संबोधनाच्या एकवचनांत ' इ ' चा विकल्पाने गुण होतो.) वारि-वारि, वारे ।

Special rule applicable to all nouns—

The final vowel is lengthened before नाम् of Gen. plural. (षष्ठीच्या बहुवचनीं ' नाम् ' च्या पूर्वी अन्त्य स्वर दीर्घ होतो.) बालक-बालकानाम् । फल-फलानाम् । उदधि-उदधीनाम् । ग्राम-ग्रामाणाम् 26.

In Sanskrit adjectives take the gender and number of the nouns they qualify. (संस्कृतांत विशेषणें विशेष्याचेंच लिंग व वचन घेतात) Adjectives ending in अ and इ are declined exactly like the nouns ending in अ and इ respectively. (अकारान्त व इकारान्त विशेषणें अकारान्त व इकारान्त नामाप्रमाणेंच हुबेहूब चालतात.)

Students should learn by heart the model declensions given on pages 34-35 of the First Book, and decline nouns and adjectives ending in अ and इ after them. (पहिल्या पुस्तकाच्या ३४-३५ पानांवर दिलेलीं रूपें विद्यार्थ्यांनीं पाठ करावी, व त्यांच्या धोरणावर अकारान्त व इकारान्त नामांचीं व विशेषणांचीं रूपें बनवावीं.).

Lesson V.

The figures given within brackets are the numbers of rules given in the Appendix of the First Book.

A king conquers (राजा जिंकतो) (नृपः जयति 36). Two horses jump (दोन घोडे उडी मारतात) (अश्वौ उत्पततः 12). People speak (लोक बोलतात) (जनाः वदन्ति 37). A child desires

(मूळ इच्छितें). Houses protect (घरें रक्षण करितात). Two eyes see (दोन डोळे पहातात). A cloud sprinkles (मेघ शिंपडतो). Two wise men leave (दोन शहाणे मनुष्य सोडतात). The wind takes away (वारा घेऊन जातो). Happiness pleases (सुख संतुष्ट करितें) (सुखम् प्रीणयति 27). An animal loses sense (जीव मोह पावतो). Two hands take away (दोन हात घेऊन जातात). Mouths become wet (तोंडें ओलीं होतात). Misery gives pain (दुःख पीडा देतें). Rama worships (राम पूजा करतो). Two sons are satisfied (दोघे पुत्र संतुष्ट होतात). Water dries (पाणी शोषतें). Two fools get angry (दोन मूर्ख रागावतात). A tortoise moves (कांसव सरतें). Two fruits fall (दोन फळें पडतात). Wealth perishes (धन नाहींसें होतें). Men go (मनुष्यें जातात) (नराः गच्छन्ति 37). Two lotuses dance (दोन कमळें नाचतात). Friends tell (मित्र सांगतात). A cook enters (आचारी आंत येतो). The sea becomes calm (समुद्र शांत होतो)

नृपा रक्षन्ति (37) । बालकौ लुभ्यतः । पुत्रः प्रीणयति । अश्वा उत्पतन्ति (37) । यवना वहन्ति (37) । ईश्वरः सृजति or ईश्वरस्सृजति (40) । वृक्षा रोहन्ति (37) । कूर्मौ सरतः । जीवा नश्यन्ति (37) । हस्तोऽस्यति (36,11) । अनलो दहति (37) । नेत्रं स्फुरति (27) । समुद्रौ क्षुभ्यतः । बुधः शाम्यति or बुधश्शाम्यति (40) । मूर्खा जल्पन्ति (37) । मित्रं पृच्छति (27) । पर्णानि पतन्ति । हृदयं तुष्यति (27) । सूदाः पचन्ति । जना निन्दन्ति (37) । जनः or जनश्शंसति (40) । कमलं भूषयति (27) । मुखं वदति (27).

The ocean is agitated (महासागर खवळला आहे). Monkeys throw (वानर फेंकतात). Two sages contemplate (दोन ऋषि विचार करतात.). An enemy gives pain (शत्रु पीडा देतो). Two hands take away (दोन हात घेऊन जातात). A king worships (राजा पूजितो) (नृपतिः यजति 38). Waters dry (पाणी सुकतात). The fire burns (विस्तव जाळतो) (अग्निः दहति 38). Poets extol (कवि वर्णन करितात). There is no water (पाणी नाहीं) (न अस्ति

9). A mountain bears (पर्वत वाहतो) (गिरिः वहति 38). Diseases perish (रोग नाहींसे होतात) (व्याधयः नश्यन्ति 36). Indra's thunderbolt falls (इंद्राचें धनुष्य पडतें). Swords fall (तरवारी पडतात). Two ascetics think (दोन यति ध्यान करतात).

धूर्जटी रक्षति (38, 29) । ऋषयः or ऋषयश्शाम्यन्ति (40) । कपयो धावन्ति (36) । कविर्वर्णयति (38) । नृपतयो नयन्ति (36) । अग्नी शाम्यतः । व्याधिस्तुदति (39) । यतयो न स्पृहयन्ति (36) । असिः पतति । अरी जयतः । हरिः कुप्यति । पाणिः सिञ्चति । पर्वतस्तिष्ठति (39) ।

Lesson VI.

A man worships God (मनुष्य ईश्वराची पूजा करितो) (27). A king punishes rogues (राजा लुच्चांना शिक्षा करितो). Rama ascends a horse (रामा घोड्यावर चढतो). (रामः अश्वम् 36, 11). A tiger eats meat (वाघ मांस खातो). (व्याघ्रः मांसम् अत्ति 36). Hari washes off (his) two hands (हरी आपले दोन हात धुतो). (हरिः हस्तौ 38). A warrior throws arrows (योद्धा बाण फेंकतो). He covets wealth (तो धनाची हांव धरतो) (27). A thief steals corn (चोर धान्य चोरतो). (स्तेनः धान्यं 36). I go to a town (मी शहराला जातों). Thou speakest a lie (तूं खोटें बोलतोस). Thou rememberest friends (तूं मित्रांना स्मरतोस.) A wise man wishes absolution (शहाणा मनुष्य मोक्ष इच्छितो). (बुधः मोक्षम् इच्छति 36). Diseases give pain to men (व्याधि मनुष्यांना पीडा देतात) (व्याधयः नरान् पीडयन्ति 36). You drink water (तुम्ही पाणी पितां). A poet praises two wise men (कवि दोन शहाण्यांची स्तुति करितो). (कविः बुधौ 38). A son appeases (his) father (मुलगा बापाचें सांत्वन करितो (पुत्रः जनकम् 36). I see a book (मी पुस्तक शोधतों). We weigh gold (आम्ही सोनें तोलतों). We two wander through villages (आम्ही दोघे खेड्यांतून हिंडतों). I eat two fruits (मी दोन फळें खातों). He sees lotuses (तो कमळें पाहतो). A servant bears a burden (चाकर ओझें वाहतो). People extol wise

men (लोक शहाण्या मनुष्यांना नांवाजतात). A fool abandons (his) two clothes (मूर्ख दोन वस्त्रें टाकून देतो). A horse eats (blades of) grass (घोडा गवत खातो) (तृणानि अत्ति अश्वः 10, 10). An ascetic leaves (his) body (यति शरीर टाकून देतो) (यतिः देहम् मुञ्चति 38). A man beats cats (पुरुष मांजरांना मारतो) (बिडालान् ताडयति 25, 39). We enter the house (आम्ही घरांत शिरतों).

रामो व्याघ्रान्पश्यति (36) । अश्वाः कोशं वहन्ति । बुधः or बुधस् स्वर्गमारोहति (40) । सिंहा गजानदन्ति (37) । फलानि गणयति । यतिर्वनं गच्छति (38, 27) । योधो बाणौ क्षिपति (36) । ईश्वरो नरान् रक्षति (36) । ग्रामौ विश्रामः । पुत्रो जनकं प्रीणयति (36) । नराः कूर्मानदन्ति । कपयो वृक्षानारोहन्ति (36) । भृत्यान् पृच्छति । पादाः क्षालयन्ति । मूर्खौ विषं पिबतः । नृपाः or नृपास् स्तेनान् दण्डयन्ति (40) । पुस्तकानि रचयन्ति । ओदनमत्थ । मित्राणि रामं स्मरन्ति । जना नृपाञ्शंसन्ति (37, 19) । प्रज्ञा जनान् नयन्ति (37) । तत्त्वं बोधामि । वेदाः or वेदास् सूर्यं शंसन्ति (40, 27) । जनको बालौ ह्वयति (36) । मूर्खा बुधान् निन्दन्ति (37) । नृपो योधं वदति (36) ।

